नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०५/२०२५ (शुक्रवार)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हे नोंद ६२ लाख ७० हजारांचा मुद्देमाल जप्त,२ आरोपी अटक, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ०८/०५/२०२५ रोजी श्री रमेश बरकते , उपविभागिय पोलीस अधिकारी, हे त्यांच्या पथकासह अवैध धंदयांवर कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, तुमसर रामटेक रोडने अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पेट्रोलींग करून खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्रमांक १.** रामटेक ते तुमसर मार्गावर पेट्रोलींग दरम्यान नवरगाव शिवार येथे ट्रक क्रमांक एम. एच. ४९ सी. एल. २७९१ येतांना दिसला त्याचे चालकाला वाहन थांबविण्यासाठी इशारा करून वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात रेती भरून होती. वाहन चालकाला त्यांचे नाव व पत्ता विचारले असता चालकाने त्याचे नाव **योगिराज ढेकल ठाकरे वय. २५ वर्षे, रा. सालई ता. मोहाडी जि. भंडारा असे असल्याचे सांगितले.** सदर वाहन चालकाला रेती वाहतुक परवाना बाबत विचारपुस केली असता त्याचेकडे रेती वाहतुक परवाना नसल्याचे सांगितले. सदर चालक हा **वाहन मालक नामे दिनेश ढोके रा. तुमसर ता.तुमसर जि. भंडारा** याचे सांगणेवरून अवैधरित्या रेती भरून नेत असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष **१) ट्रक क्रमांक एम. एच. ४९ सी. एल. २७९१ किंमती ४०,००,००० /— रूपये, २) ८ ब्रास रेती किंमती ४०,००० /— रूपये असा एकुण ४०,४०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रंमाक २.** पोलीसांना रामटेक ते तुमसर मार्गावर पेट्रोलींग दरम्यान नवरगाव शिवार येथे ट्रक क्रमांक एम. एच.४० बी. एल. १४६८ येतांना दिसला त्याचे चालकाला वाहन थांबविण्यासाठी इशारा करून वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात रेती भरून होती. वाहन चालकाला त्यांचे नाव व पत्ता विचारले असता चालकाने त्याचे **नाव दिनेश सुदाम मोहनकर वय. २५ वर्ष रा.खापा ता.तुमसर जि. भंडारा असे असल्याचे सांगितले.** सदर वाहन चालकाला रेती वाहतुक परवाना बाबत विचारपुस केली असता त्याचेकडे रेती वाहतुक परवाना नसल्याचे सांगितले. सदर चालक हा **वाहन मालक नामे कशिष डोंगरे, रा. खरबी ता. तुमसर जि. भंडारा** याचे सांगणे वरून अवैधरित्या रेती भरून नेत असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष **१) ट्रक क्रमांक एम. एच. एम. एच.४० बी. एल. १४६८ किंमती २२,००,००० /— रूपये, २) ६ ब्रास रेती किंमती ३०,००० /— रूपये असा एकुण २२,३०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**सदर कारवाईत एकुण २ वाहन आणि १४ ब्रास रेती असा एकुण ६२,७०,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**सदर प्रकरणी नमुद आरोपी वाहन चालक आणि वाहन मालक यांच्या आरोपीतांविरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) म.ज म सहीता सहकलम ४.२१. खान खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती अधिनियम अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. दोन्ही गुन्हयातील वाहन चालकांना अटक करण्यात आली आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद ०६ जनावरांची सुटका,देवलापार पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक ०८/०५/२०२५ रोजी देवलापार पोलीसांनी अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी मानेगावटेक येथे जबलपुर — नागपुर हायवे वर अचानक नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक सिल्वर रंगाची कार भरधाव वेगाने येताना दिसली. पोलीसांनी वाहन चालकास वाहन थांबविण्याबाबत ईशारा केला असता वाहन चालकाने कार न थांबविता निष्काळजीपणाने कार चालवित भरधाव वेगाने नागपुर कडे निघाला. पोलीसांनी

वाहनाचा पाठलाग केला असता चालक रोडच्या कडेला कार थांबवुन कार जागीच सोडुन अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला. **पोलीसांनी सिल्वर रंगाची मारूती सुझुकी एस एक्स ४ कार क्रमांक एम.एच. ०८ आर ५८४४ या वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये ०६ जिवंत गोवंश जनावरे (३—गाई, २—कालवड, १—गोऱ्हा ) असे मिळुन आले**. आरोपीने सदर कार चे मागचे सिट काढुन त्यात ०६ गोवंश जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक सिल्वर रंगाची मारूती सुझुकी एस एक्स ४ कार क्रं एम.एच.०८ आर ५८४४ किंमती ३,००,०००/— रूपये. व ०६ गोवंश जनावरे किंमती ९०,००० /— रूपये असा एकुण किंमती ३,९०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. सुटका केलेल्या गोवंश जनावरांना पालन पोषणाच्या दृष्टीकोणातुन गौ—विज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापार येथे दाखल करण्यात आले आहे.**

**मारूती सुझुकी एस एक्स ४ कार क्रं एम.एच.०८ आर ५८४४ चा चालकच्या विरूध्द कलम ११(१) (ड) प्रा. छ. अधि. सहकलम ५ (ए) ,९ महा. पशु संरक्षण अधिनियम सहकलम ११९ म.पो.का ,सहकलम १८४ मो.वा.का .अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने